ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

पुस्तकाचे नाव : मराठी ओनामा भाग पहिला

लेखक : त्रिंबक गणेश मेहेंदळे

प्रकाशक : विनायक विष्णु रानडे, मुंबई

प्रकाशन वर्ष : १९३३

मूळ ग्रंथ प्रत : शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प
अंकेक्षण रूपांतर – २०२४

# मराठी ओनामा

## भाग पहिला.



66
Meh
557

लेखकः—

**त्रिंबक गणेश मेहेंदळे**, टीचर, नॉर्मल स्कूल, अकोला, वऱ्हाड.

किंमत २ आणे

**PRICE 2 ANNAS.**

# अनुक्रमणिका.


| धडा. | विषय. | पान. |
|---|---|---|
| १. | गणपति. | १ |
| २. | मनगट. | २ |
| ३. | भवानी. | ३ |
| ४. | उखळी. | ४ |
| ५. | नथ. | ५ |
| ६. | घड्याळ. | ६ |
| ७. | दऊत. | ७ |
| ८. | ओठ. | ८ |
| ९. | औत. | ९ |
| १०. | इमारत. | १० |
| ११. | समई. | ११ |
| १२. | ऐनक. | १२ |
| १३. | अंगठी. | १३ |
| १४. | जहाज. | १४ |
| १५. | चमचा. | १५ |
| १६. | धनगर. | १६ |
| १७. | छत्री. | १७ |
| १८. | हरण. | १८ |
| १९. | शाळा. | १९ |
| २०. | फळा. | २० |
| २१. | झबलें. | २१ |
| २२. | गाय. | २२ |
| २३. | षडानन. | २३ |
| २४. | ज्ञानदेव. | २४ |
| २५. | क्ष. | २५ |
| २६. | नारद ऋषि. | २६ |
| २७. | स्वर. | २७ |
| २८. | व्यंजनें. | २८ |
| २९. | मूळाक्षरांची उजळणी. | २९ |
| ३०. | मूळाक्षरांची उजळणी. | ३० |
| ३१. | मूळाक्षरांची उजळणी. | ३१ |
| ३२. | मूळाक्षरांची उजळणी. | ३२ |

भाग पहिला

# धडा पहिला • १

## गणपति.



हा गणपति आहे.

गणपति बसला आहे.

गणपति छान आहे.

वाचा आणि लिहा.

गण = ग + ण

पण = प + ण


गप = ग + प

आण = आ + ण

आपण = आ + प + ण

# धडा दुसरा •• २

## मनगट.



हें मनगट आहे.

हें डावें मनगट आहे.

हें उजवें मनगट आहे.

वाचा आणि लिहा.

पट = प + ट

नट = न + ट

मग = म + ग

मन = म + न

मगन = म + ग + न

# धडा तिसरा ∴ ३

## भवानी.



ही भवानी आहे.

भवानी उभी आहे.

भवानी लढत आहे.

वाचा आणि लिहा.

भट = भ + ट

नभ = न + भ


भग = भ + ग

भणभण = भ + ण + भ + ण

भगभग = भ + ग + भ + ग

# धडा चवथा ⁘ ४

## उखळी.



उखळी दगडाची करतात.
उखळी मोठी करतात.
उखळी लहान करतात.

वाचा आणि लिहा.

तर = त + र

भर = भ + र


कर = क + र

उपस = उ + प + स

गणपत = ग + ण + प + त

# धडा पांचवा ⁘ ५

## नथ.



सोनार नथ करतात.

नथ मोठी करतात.

नथ लहान करतात.

वाचा आणि लिहा.

नथ = न + थ

मगर = म + ग + र


उपट = उ + प + ट

उकर = उ + क + र

थरथर = थ + र + थ + र

# धडा सहावा ●●● ६

## घड्याळ.



घड्याळ तास दाखवतें.

घड्याळ मिनिटें दाखवतें.

घड्याळ वेळ दाखवतें.

वाचा आणि लिहा.

खण = ख + ण

उथळ = उ + थ + ळ


उखळ = उ + ख + ळ

उघड = उ + घ + ड

खटपट = ख + ट + प + ट

# धडा सातवा •••• ७

## दऊत.



दऊत मातीची असते.

दऊत कांचेची असते.

दऊत टिनाची असते.

वाचा आणि लिहा.

ऊस = ऊ + स

ऊद = ऊ + द


गवत = ग + व + त

वखर = व + ख + र

खरवस = ख + र + व + स

# धडा आठवा ⁘⁘ ८

## ओठ.



हा ओठ आहे.

हा वरचा ओठ आहे.

हा खालचा ओठ आहे.

वाचा आणि लिहा.

आठ = आ + ठ

ओळ = ओ + ळ


ठळक = ठ + ळ + क

ओळख = ओ + ळ + ख

ओलसर = ओ + ल + स + र

# धडा नववा ⁘⁘ ९

## औत.



बैल औत ओढतात.

रेडे औत ओढतात.

घोडे औत ओढतात.

वाचा आणि लिहा.

ढग = ढ + ग


औत = औ + त

ढकल = ढ + क + ल

औरत = औ + र + त

# धडा दहावा १०

## इमारत.




ही एक इमारत आहे.
ही एक मोठी इमारत आहे.
ही एक उंच इमारत आहे.

वाचा आणि लिहा.

ए = ए
इसम = इ + स + म
इतर = इ + त + र
एकदम = ए + क + द + म
इरकल = इ + र + क + ल

# धडा अकरावा

## समई.



ही समई आहे.

समई उभी आहे.

समई जळत आहे.

वाचा आणि लिहा.

आई = आ + ई

सई = स + ई


सनई = स + न + ई

मलई = म + ल + ई

सळई = स + ळ + ई

# धडा बारावा

## ऐनक.




ही ऐनक आहे.
ऐनक मोठी असते.
ऐनक लहान असते.

वाचा आणि लिहा.

ऐक = ऐ + क
ऐट = ऐ + ट
ऐपत = ऐ + प + त
ऐरण = ऐ + र + ण

# धडा तेरावा

## अंगठी.



पुरुष अंगठी घालतात.
बायका अंगठी घालतात.
मुलें अंगठी घालतात.

वाचा आणि लिहा.

अंक = अं + क

अंत = अं + त


अंमळ = अं + म + ळ

अंतर = अं + त + र

अंगण = अं + ग + ण

# धडा चौदावा

## जहाज.



हें जहाज आहे.

जहाज लहान असतें.

जहाज मोठें असतें.

वाचा आणि लिहा.

आज = आ + ज

जर = ज + र


भजन = भ + ज + न

जवळ = ज + व + ळ

ऐवज = ऐ + व + ज

# धडा पंधरावा

## चमचा.



चमचा पितळेचा असतो.

चमचा चांदीचा असतो.

चमचा जस्ताचा असतो.

वाचा आणि लिहा.

चढ = च + ढ

चव = च + व


उचल = उ + च + ल

चरत = च + र + त

चटकन = च + ट + क + न

# धडा सोळावा

## धनगर.



धनगर बसला आहे.
धनगर मेंढरें राखीत आहे.
धनगर मेंढरें चारीत आहे.

वाचा आणि लिहा.

धर = ध + र

मध = म + ध


धन = ध + न

धरण = ध + र + ण

सधन = स + ध + न

# धडा सतरावा

## छत्री.



छत्रीनें पाऊस लागत नाहीं.
छत्रीनें ऊन लागत नाहीं.
छत्रीनें वारा लागत नाहीं.

वाचा आणि लिहा.

छत = छ + त

छगन = छ + ग + न


अवघड = अ + व + घ + ड

अवचट = अ + व + च + ट

अवसर = अ + व + स + र

# धडा अठरावा

## हरण.



हें हरण आहे.

हरण उभें आहे.

हरण चरत आहे.

वाचा आणि लिहा.

हळद = ह + ळ + द


हसन = ह + स + न

हजर = ह + ज + र

नरहर = न + र + ह + र

# धडा एकोणिसावा

## शाळा.



ही शाळा आहे.

शाळा बंद आहे.

शाळा चालू नाहीं.

वाचा आणि लिहा.

दशक = द + श + क

शहर = श + ह + र


शरम = श + र + म

शरण = श + र + ण

शपथ = श + प + थ

# धडा विसावा

## फळा.



फळा काळा असतो.
फळा लाकडाचा असतो.
फळा चौकोनी असतो.

वाचा आणि लिहा.

फळ = फ + ळ
फणस = फ + ण + स
फसव = फ + स + व
फजल = फ + ज + ल
अवजड = अ + व + ज + ड

# धडा एकविसावा

## झबलें.



झबलें कापडाचें करतात.

झबलें लहान करतात.

झबलें मोठें करतात.

वाचा आणि लिहा.

झड = झ + ड

झडप = झ + ड + प


झटपट = झ + ट + प + ट

झटकन = झ + ट + क + न

झकपक = झ + क + प + क

# धडा बाविसावा

## गाय.



ही गाय आहे.

गाय उभी आहे.

गाय चरत आहे.

वाचा आणि लिहा.

भय = भ + य

वय = व + य

अभय = अ + भ + य

सदय = स + द् + य

गय = ग + य

# धडा तेविसावा

## षडानन.



हा षडानन आहे.

षडानन उभा आहे.

षडानन गणपतीचा भाऊ आहे.

वाचा आणि लिहा.

औषध = औ + ष + ध

षटकोण = ष + ट + को + ण

षटपाद = ष + ट + पा + द

षणमास = ष + ण + मा + स

आण = आ + ण

# ज्ञानदेव.



हे ज्ञानदेव आहेत.

ज्ञानदेव साधु आहेत.

ज्ञानदेव भजन करीत आहेत.

वाचा आणि लिहा.

अज्ञ = अ + ज्ञ


तज्ञ = त + ज्ञ

यज्ञ = य + ज्ञ

आज्ञा = आ + ज्ञा

ज्ञान = ज्ञा + न

# धडा पंचविसावा



हा क्ष आहे.

क्ष अक्षर आहे.

क्ष जोडाक्षर आहे.

वाचा आणि लिहा.

क्षण = क्ष + ण

यक्ष = य + क्ष

रक्ष = र + क्ष

अक्षर = अ + क्ष + र

क्षणभर = क्ष + ण + भ + र

# नारदऋषि.



हे नारदऋषि आहेत.

नारदऋषि उभे आहेत.

नारदऋषि गात आहेत.

वाचा आणि लिहा.

ऋण = ऋ + ण

ऋषि = ऋ + षि

ऋतु = ऋ + तु

ऋचा = ऋ + चा

ऋग्वेद = ऋ + ग्वे + द

# धडा सत्ताविसावा

## स्वर.

अ आ इ ई उ ऊ

ऋ [ ॠ ऌ ॡ ]

ए ऐ ओ

औ अं

अः

# धडा अठ्ठाविसावा

## व्यंजनें.

क ख ग घ ङ

च छ ज झ ञ

ट ठ ड ढ ण

त थ द ध न

प फ ब भ म

य र ल व

श ष स

ह ळ क्ष

ज्ञ

# धडा एकोणतिसावा

## मूळाक्षरांची उजळणी.

ए ब न ऊ ठ क प द

ऐ म द ल व र ळ

ण आ छ ग

ए बबन, ऊठ.

एक पद ऐक.

मदन, लवकर पळ.

एक ऐरण आण.

# धडा तिसावा

## मूळाक्षरांची उजळणी.

ज अं ड द

त भ क्ष

औ ओ

ध

जगन, अंगण कर.

दगड ढकलत आण.

भरत, क्षणभर पळ.

लछमन, औत ओढत आण.

करवत बळकट धर.

# धडा एकतिसावा

## मूळाक्षरांची उजळणी.

झ ट च

अ स उ ई

थ घ

ख

कमल, अननस आण.

सगन, ऊस उपट.

कढईभर रस आटव.

आई, नथ बघ.

सई, खण धर.

छगन, झटकन चल.

# धडा बत्तिसावा

## मूळाक्षरांची उजळणी

य ज्ञ फ श

इ ष

आऊ, यज्ञ बघ.

मणभर हळद दळ.

दलपत, डफ मढव.

शरद, इसब बघ.

गणपत, औषध आण.

हसन, शहरभर पळ.

# प्रस्तावना.

आज ‘ ओनामा ’ चा पहिला भाग बाहेर पडत आहे. हे पुस्तक लिहिण्याची सूचना दिल्याबद्दल त्या वेळचे वऱ्हाडचे इन्स्पेक्टर ऑफ स्कूल्स मि. D'Silva साहेब यांचा मी अत्यंत ऋणी आहें. त्याचप्रमाणें अकोला नॉर्मल स्कूलचे सुपरिंटेंडेंट श्री. जोग साहेब यांनीं शैक्षणिक प्रयोग करून दिल्याबद्दलहि मी त्यांचा फारच ऋणी आहें.

शेवटीं कर्नाटक प्रिंटिंग प्रेसचे प्रोप्रायटर श्री. मं. ना. कुळकर्णी यांनीं ८, २४, २५ व २६ या पानांवर आलेल्या चित्रांच्या ब्लाकांखेरीज कव्हरावरील व या पुस्तकांतील बाकी सर्व चित्रांचे डिझाइन्स व ब्लाक त्यांचे मालकीचे असतांहि या आवृत्तीपुरतेच या पुस्तकांत वापरण्यास परवानगी दिल्याबद्दल व काम अपेक्षेपेक्षां लवकर करून दिल्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें.

वांद्रें—मुंबई,
२४ जून १९३३.

त्र्यं. ग. मेहेंदळे.

---

## या पुस्तकाचा उपयोग करणारांस सूचना.

मराठी ओनामा, भाग पहिला, हें पुस्तक आरंभीं मराठी शिकणारांसाठीं लिहिलें आहे. याची रचना पुढीलप्रमाणें आहे. प्रत्येक सचित्र धड्यांत चित्रास अनुसरून अशीं तीन तीन वाक्यें दिलीं आहेत. या वाक्यांच्या खालीं धड्यांत येणाऱ्या मूळाक्षरांपासून होणारे सोपे पांच पांच शब्द पृथक्करणपद्धतीनें जुळवून दाखविले आहेत.

१. आरंभीं धड्यांतील चित्रांविषयीं माहिती संवादपद्धतीनें करून द्यावी.

२. धड्यांतील वाक्यें उत्तरांत येतील असे सूचक प्रश्न विचारावे.

३. प्रत्येक प्रश्नाचें उत्तर पूर्ण वाक्यांत येईल असा प्रयत्न करावा.

४. धड्यांतील एक एक वाक्य सावकाश, शुद्ध व स्पष्टपणें स्वतः तीन चार वेळां वाचून दाखवावें आणि एकसमयावच्छेदेंकरून वाचून घ्यावें.

५. याप्रमाणें वाक्यवाचन चांगलें बिनचूक येऊं लागलें म्हणजे ह्या धड्यांतील सर्व शब्द वाचण्यास शिकवावे. ते असे कीं पुनःपुनः येणारे शब्द प्रथम शिकवावे. नंतर इतर शब्द शिकवावे.

६. शब्दांची ओळख पूर्णपणें झाल्यावर धड्यांत येणारीं मूळाक्षरें जुळवून होणारे वाक्यांखालीं दिलेले शब्द वाचण्यास शिकवावें.

७. शेवटीं अशा शब्दांत आलेल्या मूळाक्षरांची ओळख करून द्यावी.

८. जरूर तर ड्राईंगपेपरसारख्या जाड कागदावर प्रत्येक धड्याचा सचित्र सोईवार तक्ता तयार करून उपयोगांत आणावा.

९. अशा रीतीनें अक्षरओळख झाल्यावर पुस्तकांतील शेवटचे चार धडे वाचून घ्यावे.

वरील सूचनांप्रमाणें या पुस्तकाचा उपयोग केल्यास मूळाक्षरांची ओळख हांसत खेळत होईल असा भरंवसा आहे.

प्रकाशकः—विनायक विष्णु रानडे,
रंगारीची चाळ, दादर, मुंबई.

मुद्रकः—एम्. एन्. कुळकर्णी, कर्नाटक प्रिंटिंग प्रेस,
३१८ ए, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

( सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन )